# भीती दाखविणे हा मोठा कुसंस्कार–ज्ञानेश पुरंदरे

नांदेड – जगाच्या कल्याणाचा विचार करणारी आपली संस्कृती आहे. त्याग आणि समर्पण हा आपला धर्म आहे, पण आज या धर्माचाच आपल्याला विसर पडला आहे. इतरांना घाबराविण्यात आपण थोरपणा शोधात आहोत, पण भीती दाखविणे आह सर्वात मोठा कुसंस्कार आहे, असे प्रतिपादन जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश पुरंदरे यांनी केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात आयोजित 'आव्हान-२०१९' दहा दिवसीय राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिरात ते प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.रमजान मुलाणी, तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ.शिवाजी शिंदे मंचावर उपस्थित होते.

पुरंदरे म्हणाले, आपण समाजाचे देणे लागतो याचा विचार मनात सदैव बाळगा. छत्रपती शिवाजी



महाराज म्हणजे कर्तुत्वाचा साक्षात अविष्कार होते. त्यांचा जनकल्याणाचा ध्यास आपली प्रेरणा झाली पाहिजे, असे ते म्हणाले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून बोलतांना डॉ.शिवाजी शिंदे म्हणाले, शिक्षणाला ओझे समजू नका तर त्याचा आनंद घ्या, असे सांगत आपली गरज कोणती आणि चैन कोणती याचे अंतर समजून घ्या. हे स्पर्धेचे युग आहे, तुमच्या पुढे खूप आव्हाने उभे आहेत. पण आव्हानाला घाबरू नका आव्हान पेलण्याची हिंमत शेतकऱ्याकडून शिका. आणि सत्याची कास सोडू नका, असे विद्यार्थ्यांना त्यांनी आवाहन केले.

शिकलेली माणसे दुःखी का आहेत ! ते घोटाळेबाज का आहेत ? जुनी माणसे आडाणी होती, पण ती दुसऱ्याला फसवीत नव्हती. आता दुसऱ्याच्या दुःखात शामिल होण्याची संवेदनताच संपली असेल तर हीच मोठी आपत्ती आहे, असे ते म्हणाले. कार्यक्रमाच्या प्रारंभी पाहुण्यांचा परिचय व प्रास्ताविक विद्यापीठाच्या रासेयोचे संचालक डॉ.शिवराज बोकडे यांनी केले. डॉ.कुमार बनसोडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ.ज्ञानोबा मुंढे यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी आव्हान-२०१९'चे समन्वयक डॉ.अविनाश कदम, जनसंपर्क अधिकारी डॉ.अशोक कदम, सहाय्यक कुलसचिव डॉ.सरिता यन्नावार, डॉ.दिगंबर तंगलवाड आदींची उपस्थिती होती.